|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :- २८ डिसेंबर, २०२३

---

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्याकडे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा प्रभारी पदभार देण्यात आला असून उद्या दि.२९ डिसेंबर रोजी ते पदभार स्वीकारणार आहेत.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु म्हणून प्रा. प्रमोद येवले काम पाहत असून त्यांचा कार्यकाळ संपत असल्यामुळे राजभवनातून राज्यपाल श्री. रमेश बैस यांनी प्रा.माहेश्वरी यांना अमरावती विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु म्हणून पदभार स्वीकारण्याचे आदेश दिले आहेत. उद्या दि.२९ डिसेंबर रोजी प्रा.माहेश्वरी हे प्रा. येवले यांच्याकडून पदभार स्वीकारणार आहेत.

बातमी क्र.२

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या लष्करी नीतीवर होणा-या राष्ट्रीय चर्चासत्राच्या माहितीपत्रकाचे विमोचन गुरूवार दि. २८ डिसेंबर रोजी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते व सर्व व्यवस्थापन परिषद सदस्यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक महोत्सवाच्या निमित्ताने दि. १६ व १७ फेब्रुवारी २०२४ रोजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. “छत्रपती शिवाजी महाराजांची लष्करी नीती आणि प्रशासकीय धोरणांची आधुनिक युगातील प्रासंगिकता” हा चर्चासत्राचा विषय आहे. या चर्चासत्राच्या माहितीपत्रकाचे विमोचन गुरूवारी झाले. यावेळी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, प्रा. अनिल डोंगरे, प्रा. एस. टी. भुकन, प्रा. सतिष कोल्हे, प्राचार्य संजय सुराणा, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. सुरेखा पालवे, नंदकुमार बेंडाळे, ॲड. अमोल पाटील, नितीन झाल्टे, प्रा. महेंद्र रघुवंशी, डॉ. पवित्रा पाटील, डॉ. संदीप पाटील, डॉ.

विनोद पाटील, सीए. रवींद्र पाटील, प्रा. योगेश पाटील, कला व मानव्यविद्या प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. रामचंद्र भावसार, डॉ. तुषार रायसिंग, विलास कुमावत उपस्थित होते.

---------------------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वास

जनसंपर्क अधिकारी